# प्रभुतरुण

| वर्ष ४८ | अंक ९ | मुंबई | मार्च २०१५ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

*( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )*

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर**    *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*संपादकीय*

## चिरायु आठवण

**—सुहासिनी कीर्तिकर**



**श्री. रवींद्र मानकर**

मानसशास्त्रज्ञ गोलमन यांनी तीन प्रकारची बुद्धीमत्ता मानली आहे. पहिली 'मॅथॅमॅटिकल इंटलिजन्स'- जी सर्वसामान्यपणे सर्वच जण मानतात. म्हणजे अमूक एकजण हुशार आहे असं म्हटलं की त्याचा गणिती बुध्यांक चांगला आहे, तो अभ्यासात अग्रणी आहे असं आपण समजतो. आपली 'गणिती हुश्शारी' तेव्हढीच! पण 'इंटलिजन्स' ही बाब एवढ्यातच संपत नाही. गोलमनच्या मते दुसरी बुद्धीमत्ता ही 'इमोशनल इंटलिजन्स' असते. सगळेच्या सगळे गणिती भावनांना समजून घेत त्यातही हुशारी दाखवतात; असं नाही. उलट असे अनेक विद्वान आपल्या घरात, नातेवाईकांत कोरडेपणाने किंवा कधी तिरसटपणाने वागतात. 'इमोशनल इंटिलिजन्स' हा घटक संत महात्म्यात असतो म्हणे. म्हणून 'चिंता करतो विश्वाची' अशी त्यांची अवस्था असते. हा अशा वागण्याने हुरळेल, हा अशा वागण्याने दुखावेल, या वागण्यामुळे सारे माझ्या काबूत येईल... इत्यादी मानसिक गणिते सोडविण्यातही अशी माणसे वाकबगार असतात. 'इमोशनली ब्लॅकमेलिंग' यातूनच घडते म्हणे. अशीही माणसं आपल्याभोवती असतातच. निवडणूका आल्या की मतदारराजाशी संवाद या इमोशनल इंटिलिजन्सचाच आधार घेऊन होत असतो. तिसरी बुद्धीमत्ता असते ती 'सोशल इंटिलिजन्स' म्हणजे समाजकार्य करताना भविष्यवेधी आडाखे बांधावे लागतात. मग अशा कामाला विधायक रूप प्राप्त होते. एखाद्या संस्थेशी बांधीलकी जुळवताना ती संस्था कशी आकाराला आली पाहिजे, तिचे कार्य काय असायला हवे, तिचा आर्थिक डोलारा नीट उभारता आला पाहिजे इ. विषयी ठोस आणि तर्कशुद्ध विचार मांडणी करता येणे म्हणजे 'सोशल इंटलिजन्स'. या वर्गीकरणाचा आपण कधी फारसा विचार केलेला नसतो. मग हे वर्गीकरण मला आत्ताच का आठवावे?

आठवले; त्याला एक कारण आहे. 'प्रभुतरुणा'चे विश्वस्त श्री. रवीन्द्र रामराव मानकर या नवीन वर्षात अनंतात विलीन झाले. ते 'प्रभु तरुणा'चेच केवळ विश्वस्त नव्हते. 'पाठारे प्रभु चॅरिटीज'चेही 'बहुजनांसी आधारू' असे विश्वस्त होते. श्री. रवीन्द्रांकडे वर उल्लेखलेली तिन्ही प्रकारची बुद्धीमत्ता होती. हाँगकाँग बँकेत उच्च पद सांभाळताना त्यांनी विदेश निवास केला, अनुभव गाठीशी बांधला कारण त्यांच्याकडे गणिती बुद्धीमत्ता होती. नोकरी, शेअर्सचा व्यवहार यातून बराच पैसाही गाठीशी बांधला. वीस वर्षांपूर्वी पंधरा हजारांना घेतलेल्या शेअर्समधून चार वर्षांपूर्वी त्यांना एकदम पंच्याऐंशी हजार मिळाल्याची आनंददायी घटना त्यांनी मला अगदी अभिमानाने सांगीतली होती. पण एवढेच नाही. 'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे, उदास विचारे वेच करी' या वचनाचे त्यांनी तंतोतंत पालन केले. घरच्या गणपतीला सोहळ्याला साजेल असा खर्च करणे, भावंडांची जबाबदारी पेलणे, त्यांना मार्गी लावणे, 'प्रभुतरुणा'ची एखादी वार्षिक सभा स्वतःच्या घरी घेणे ('प्रभुतरुण'हे त्यांचे कुटुंबच होते!) आदी व्यवहारात त्यांनी खर्च केला. 'प्रभुतरुण' काय; किंवा 'चॅरिटीज' काय; त्यांची आर्थिक गणिते वेळ खर्च करून बसवून दिली. 'प्रभुतरुणा'च्या सभा अगदी मालाडपासून गिरगावपर्यंत कुठेही, कोणाच्याही घरी असू देत. रवीन्द्र मानकर न चुकता सभेला हजर. अगदी वयाच्या पंच्याऐंशीव्या वर्षीसुद्धा आगगाडी, रिक्शाने प्रवास करण्याची त्यांची तयारी असायची. म्हणायचे, 'नाबाद शंभरी गाठायला फक्त पंधरा

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## Weekend Dairies

**-Rajesh Navalkar**

"WEEKEND" for any individual is like Festivity coming Home ... be it a Working person, Business man, a Student or even a Home maker ..

So, whats this about Weekends that everybody looks forward to ... or at-least wants to indulge in ..

There was a study/survey conducted by me whilst I was venturing into Expeditions and Tours which was linked to my Photographic assignments and I was amused with the findings people shared with me ... which i thought i should share with you people too. I am sure you will all relate yourself with it in some way or the other...

The approaching of Saturday, Sunday .. or even Friday evenings runs a fever of excitement amongst us ...moreover cause most of us have a holiday from work and we intend to indulge into doing something which will shake off the stress and tension caused during the whole week.

Its a mixture of feelings amongst people.. on how they want to spend their Weekend. Restaurants, Pubs, Bars and Gourmet clubs are amongst the hot lists of "Wants" on a Friday evening mostly amongst the youngsters and the office goers .. "Drink and Be Merry" is the Mantra. And why not ... after a stressful long week its rational enough to roll up your sleeves, let your hair down and Chill.

The categories of eateries have increased offering numerous specialties to satisfy ones tastebuds. Its nice to see that people have become more knowledgeable in terms of culinary varieties, thanks to the numerous television food channels showcasing food varieties around the world, and to satisfy their taste buds there are multiple multi cuisine outlets which have sprung up in the city. Pub culture has elevated itself to new heights, bars and hangouts increased.. people have a wide variety of options to choose now.. depending upon their crowd or wallet size .. they can choose their night out joints. I remember someone telling me ... the category of the joints to visit on a weekend depends upon which day of the month it is .. the reason being obvious.. Salaries

With the economic influx the access to luxurious assets/ items have become more easy...rather the power of spending has gone up. In todays times, items which once formed luxurious are now falling in the necessity category. Plastic money has become a integral part of a persons wallet now giving the person more confidence ...more power ... to spend.

There's this new genset of enthusiasts which have sprung up who love to go for Outings during the weekend ... they love Long Drives !

Fortunately .. there are a lot of Weekend Spots mushroomed in and around Mumbai providing the Gate-Away seeked by the Weekenders. Lonavala, Khandala, Karzat, Matheran & Mahableshwar are amongst the hills...on the sea front you will find people venturing for long drives down NH17, amazing locations down the Konkan sea belt...Alibaug, Murud right upto Guhaghar & Dapoli.. then on the other side on the western express highway we have spots beyond Vasai & Virar.... Safala, Bordi, Vapi and one more detour takes you beyond Kalyan, Murbad and Malsejh...

The treks down Loah Ghad or the Twilight Trek to Harishchandraghad are some of the most raved treks of today. Karzat is full of farm-houses and Matheran and Mahableshwar give you the feel of the Walking through the Clouds.

NH17 is one of my favorite drive down the Coastal sea-belt and very soon you will see me coming up with a Photographic Exhibition featuring the Konkan

(Cont. on Page 2 col. 3)

(पान १ कॉलम २ वरून)

वर्षे आहेत अजून. मी धावती बससुद्धा पकडतो.' विहंग नायक तर त्यांना आपल्या ज्ञातीतला 'तरुण देवानंद' म्हणायचे! 'प्रभुतरुणा'च्या एका वाढदिवसाला कै. मुकुंद अजिंक्य यांच्या हस्ते त्यांचा सत्कार केला गेला. त्यावेळी ते म्हणाले होते, 'तुम्ही देवानंद म्हणता. अनेकजण मला सांगतात की मी बाळासाहेब ठाकऱ्यांसारखा दिसतो'. मी तेव्हा माझ्या निवेदनात त्यांना ग्वाही दिली होती की 'यू लुक जस्ट लाइक रवीन्द्र मानकर!' दिसण्याचे जाऊ द्या; पण वृत्तीने ते खरोखरच फक्त रवीन्द्र मानकरांसारखेच होते!

म्हणूनच विहंग गेल्यावर आम्ही 'प्रत्युष' सादर केले तेव्हा ते मला म्हणाले होते, 'तुम्ही खूप चांगलं काम करता आहात. पैशांची काहीही अडचण आली तर मला सांगा.' नुसतं म्हणून ते थांबले नाहीत, प्रत्येक वेळी त्यांनी दहा दहा हजारांची स्वतःहून मदत केली. माझ्या निवेदनाबद्दल, भाषणाबद्दल, लेखनाबद्दल आणि कामाबद्दल त्यांना खूपच आत्मीयता होती. आदराचीही भावना होती. ही आदराची भावना त्यांच्याबद्दल माझ्यासकट सर्वांनाच होती. केवळ आदर नव्हे; आधारही वाटत असे त्यांचा. म्हणूनच त्यांची नव्वदी अनेकांनी वैयक्तिक आणि संस्था पातळीवर सार्थपणे साजरी केली. पण काळाची गती कोण रोखणार? 'रामकृष्णही आले गेले, त्यावीण जग का ओसची पडले?' हा प्रश्न सत्यवादीच आहे. या काळाच्या वेगाबरोबर पावलं टाकताना त्यांच्या संसारातील सावली असणारी त्यांची सौभाग्यवती गेली, नंतर अलीकडे त्यांची बहीण गेली. त्यांची मुलगी सौ. हर्षाने त्यांना पावलं टाकायला मदत व्हावी म्हणून ऑकलंडला स्वतःकडे नेलं. पण काळ तो काळच. रवीन्द्र मानकरांसारख्या यशस्वी माणसाला, उमद्या व्यक्तिमत्वाला विस्मरणाची व्याधी जडली. हर्षाने आपल्याकडे त्यांचा एकाण्णवावा वाढदिवस साजरा केला; तोही विस्मरणात गेला!

रवीन्द्र मानकर पंधरा सालच्या नववर्षात - जानेवारीत काळाच्या स्वाधीन झाले. आधी अधूनमधून मुलीकडे फेऱ्या मारणारे रवीन्द्र हर्षाला, नीलिमला, नताशाला आता आठवत असतील. आम्हालाही श्री. रवीन्द्र मानकर सततच आठवत रहाणार. त्यांना शेवटी शेवटी विस्मरणाची व्याधी जडली होती तरी आम्हाला, आणि सर्वच ज्ञातीयांना त्यांचे, त्यांच्या कार्याचे, त्यांच्या वृत्तीचे विस्मरण कधीही होणार नाही.

त्यांची आठवण चिरायु आहे. त्यांच्या कुटुंबीयांनीही या चिरायु आठवणींचा तराफा करून आता पुढे पुढे जायचे आहे. जातच रहायचे आहे. (बेटा नताशा लक्षात ठेव. आपण सर्वच या तराफ्यावर बसून जगत रहाणार आहोत तुझ्या आईवडिलांसह)

*

## MR. RAVINDRA MANKAR AS I KNEW HIM

**-Sujan Rane**

16th February 2015 was a day of mixed feelings. I was feeling elated and happy at my singing performance on 14th February 2015 at the Gomantak Vidya Niketan, Madgaon, Goa under the banner of Anahatnaad, particularly because the local newspaper Lokmat was effusive in its praise of my performance and had published my name in its heading with my photo while performing. As I was relaxing in Panjim, Goa, post my performance, I received a call from my wife Neelima from USA that Mr.Ravindra Mankar whom we affectionately called Ravindra Bhaojee had passed away at his daughter Harsha Trilokekar's place in New Zealand.

Naturally my feeling of happiness gave way to one of considerable sadness. I knew Ravindra Bhaojee right from the time I had joined Hongkong Bank, Bombay ( HSBC) in 1955. He was known as a well-qualified and intelligent young Officer, specially for his good command over English. In recognition of his qualities he was sent to the Bank's London Office for training and subsequent promotion. To touch upon the personal side of my association with him, I have to say with an element of gratitude that I got married through him to Neelima Rane who belonged to the reputed family of Dadajee Dhakjee in our community. In course of time Ravindra Bhaojee rose to become a senior Officer and was deputed as an Internal Auditor to the British Bank of the Middle East in Dubai. But what struck me most is that in his post retirement stage, this man was extremely active in our community affairs, he strove every nerve to ensure that he did justice to the cause of of our community. His singular achievement was that under his care the amalgamation of Pathare Prabhu Charities and Pathare Prabhu Relief Fund took place. He took great care to see that the funds of these two age-old institutions were securely invested. If I am not wrong, though he kept on shuttling between India and New Zealand for the past some years until his demise, his heart always lay in the welfare of our community. Justifiably he was a Trustee of the Pathare Prabhu Charities as well as Prabhu Tarun. Many past and present luminaries in our community have rendered yeoman service for the welfare of our community and Mr. Ravindra Mankar was indeed one of them. His contribution towards the cause of our community will be remembered undoubtedly over the years to come.

*

विस्तारीत संपादकीय

(पान १ कॉलम ४ वरून)

belt ... won't say much about this project now but you will love to see the project when completed.

Konkan has a lot to offer .. rustic locations.. scenic landscapes.. sun baked and grounded people...and an amazing sea food cuisine. At Ghuaghar... the Water Spouts are a "Must Watch" during the incoming of the high tide....water gushes through the black stones towards the hills and is thrown 40 feet up in the air.. its an amazing display of the strength of the sea.

Dapoli, on the other side is a sleepy village with hardworking fisher folks. It's a sight to watch the fish auction on Hernai beach and if you are lucky you will land up with huge catch of pomfrets or prawns for your barbecue sessions during the stay

The general tendency is to drive out of Mumbai on a Friday evening after work or on a Saturday early morning .. spend one and a half day with friends or family at the outdoor location and return with beaming faces on Sunday evening ready to take on the forthcoming week. All these scenic locations offer a complete package for an outing like stay, food & drinks making the visitors stay more Comfortable and Cosy.

Like I mentioned earlier, the purchasing capacity of a person has increased three folds and with that a new generation of enthusiasts called Amateur Photographers have emerged with swanky cameras and equipment's having tremendous appetite for what Nature & WildLife has to offer.

These set of people form a new group of Weekenders. They are more adventurous and love to venture into habitats with scenic horizons and natures galore. Nature has a lot to offer ... trails, landscapes, river fronts, Mountains, Sea fronts ... and the best of all – Wild Life !

One would wonder how can a person decide the right place to go, or the right kind of location for his indulgence..because its just the weekend that he has in his hands and to make so many arrangements becomes more of a challenge ... but not to worry .. as the economist say ..where there is a demand you will find supply.

Yes .. there are a number of adventure camps or organizers who organise these outings for the enthusiasts.. Photographic expeditions, Nature trails, Hiking, Heritage walks are amongst few of the ventures ... the closest being a guided tour of Borivli National Park also know as Sanjay Gandhi Udhyan. The guided tour is so soothing, you will be amazed to find so much of Nature in its abundance right in the City.

The other spots being Karnala, Tadoba, Pench, Kanha having a splurge of Nature and Wild Life. The Flamingoes at Shiwri or the hatching of the turtle eggs at Velas Beach has people flocking to get their best shots.

Thanks to the social medias, these amateurs have a platform to share/showcase/display their talent.. and yes.. get appreciation from people too.

Well .. I spoke to one more set of people who love to spend their weekend amongst the company of their Family and Friends .. and these are the ones who love House Parties. With a majority of Nucleus families around us now a days, Organizing house parties is a "In thing" these days as it lets you be with your family members as well as in the company of your friends .. its a Win Win situation for all. People order food and drinks from the nearby take away joints .. get together in an apartment and party. Chat and Gossip was the main ingredient of the yesteryears .. has been taken over by Sit-Out Singing and Karaoke Nights. Who doesn't sound like Kishore Kumar or Rafi saab after two down ? But the bonding amongst everyone is amazing and that what matters at the end of the day isn't it ?

I also got to talk to a set of people who didn't know what to do for a Weekend, so much so that they invariably land up going to a Shopping Mall. Shopping Malls these days are a package deal by themselves. They offer everything under the sun.. be it Movies, Food joints, Gaming Zones, Garments, Grocery and even Spa's and Saloons. Kids are taken care off in the gaming zones .. husbands are taken care off in the lounges .. Wives are taken care off in the jewelers sections ..what more can one want ... you have a Car Spa too in the parking zone.

So all in all I gathered that there is something or the other for all of us to indulge into during the Weekends and Unwind. Its upon us how we choose to live our Saturdays and Sundays. Be it Family time or time with Friends, we have a choice to make the most out of it.

So...do we relate with any of the ideas mentioned ? Or is being a Couch Potato also an option ? Would love to know your thoughts on how you spend your weekends. I am sure I have a lot to learn .....

*

लेखांक-३

# अर्थसंवाद

-सौ. उर्वशी आनंद धराधर

'मोदी जेटली' अर्थसंकल्प, ८५ वा अर्थसंकल्प नुकताच २८ फेब्रुवारीला सादर झाला. ज्याला त्याला 'मोदी - व्हीजन' काय असेल याची उत्सुकता लागली होती. बजेट सुरू होण्यापूर्वी सर्व तऱ्हेच्या लोकांना आपणास त्यातून नक्की काय फायदा होईल त्याचा विचार पडलेला असतो.

नोकरवर्गाला वाटते पगारावर पडणारा प्रत्यक्ष कर कमी व्हावा. कर मर्यादेच्या उत्पन्नाची रक्कम वाढवावी. वित्तीय तूट व महसुल तूट कशी कमी राखली जाईल हा विचार सरकारच्या मनात येतो. व्यवसाय करणाऱ्यांना आपल्यावरील निर्बंध किती कमी होतील, उत्पादन वाढण्यास परिस्थिती अनुकूल असेल का, आपले उत्पन्न कसे वाढेल ही विवंचना असते. प्रत्यक्ष कर कायदा सुलभ व्हावा असे सर्वांना वाटते. भारत चलन-युद्धाला यशस्वी उत्तर देऊ शकेल का? ही चर्चाही आपण ऐकतो. रोजगार वाढीस लागतील का? तरुणांना त्यावर मोठी अपेक्षा असते. महागाई ग्राहक उपभोक्त्यांना तीव्र जाणवते. साहजिकच बचतीचा दर, गुंतवणूकीचा कसा वाढेल ते आपण पाहतो.

आपण 'मेक इन इंडिया' म्हणजे भारतात बनवा' ही महत्त्वाकांक्षी योजना यशस्वी करण्यासाठी मोदी सरकार समाजातील सर्व घटकांना एकत्र येऊन काम करण्यास सांगताना दिसते. देशात पायाभूत सुविधा वाढवणे गरजेचे आहे. आज मुंबई, पुणे, नाशिक येथे रोजगार संधीसाठी कित्येक तरुण येत आहेत. मग त्यांच्यासाठी देशाचे औद्योगिकीकरण या अर्थसंकल्पामुळे किती पोषक ठरेल; रोजगार संधी व कुशल कामगार प्रतिभा वाढवण्यासाठी अभियंत्याचा दर्जा व गुणवत्ता सुधारण्यासाठी अर्थसंकल्प नक्की काय प्रयत्न करीत आहे. या सर्व गोष्टींनी आपर भांबावून जातो. बँका अर्थसंकल्पामुळे व्याजदर धोरण कसे राहील हा विचार करतात. एकूण काय सुलभतेने व विनासायास व्यवसाय करता यावा, कायद्याच्या तरतूदी सरकारी पर्यवेक्षकांचा जाच नसावा ही अपेक्षा सर्वांची असते. मग 'अर्थसंकल्प' ही जादूची कांडी सर्वांच्या अपेक्षा पूर्ण करणारी ठरावी हा मोठा चॅलेंज अर्थमंत्री अरूण जेटलींवर होता. आता आपण या सर्व पार्श्वभूमीवर अर्थसंकल्पाचा ढोबळ आढावा घेऊ.

नोकरदारांसाठी करमुक्त उत्पादनाची मर्यादा पूर्वीइतकीच ठेवली आहे. त्यामुळे महागाईत उत्पन्नाची थोडी भर होईल असे शक्य नाही उलट सेवाकर हा १२.३६ टक्के वरून १४ टक्के झाला त्यामुळे महागाईत थोडी वाढच होईल.

उद्योगधंद्यांसाठी ५ टक्क्याने कर कमी केला आहे. हा कर ३० टक्के वरून २५ टक्क्यांवर आणताना त्याची अंमलबजावणी एप्रिल २०१६ पासून पुढील ४ वर्षांसाठी होणार आहे. म्हणजे या वर्षी त्याचा फायदा मिळणार नाही.

आपल्या देशात युवक वर्गाचे प्रमाण जास्त आहे. किमान ६० टक्के जनता ही २५ वर्षे वयातील आहे. त्यामुळे युवकांना 'नोकरी करण्याऐवजी' 'नोकरी देणारे होण्यावर' भर दिला आहे. साहजिकच कोठल्याही उद्योगाला आवश्यक त्या सुखसोयींचा पाठपुरावा करणे जरूर आहे. त्या दृष्टीने विकासाला चालना मिळण्याचा प्रयत्न केला आहे.

संपत्ती कर रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे त्यासाठी लागणारा वेळ त्याचे कामकाज पाहणारी यंत्रसामुग्री आता वाचेल. या ऐवजी १ कोटीहून अधिक वार्षिक उत्पन्न असलेल्या श्रीमंतांना अतिरिक्त २ टक्के अधिभार लागणार आहे.

करबुडवेगिरी, काळा पैसा यावर नियंत्रण ठेवण्याचे उपाय या अर्थसंकल्पात मांडले आहेत. त्यानुसार उत्पन्न आणि संपत्तीची माहिती लपविल्यास किंवा विदेशातील मालमत्तेबाबत करचुकवेगिरी केल्यास १० वर्षापर्यंत कारावासाची शिक्षा जाहिर केली आहे. याशिवाय ३०० टक्के पर्यंत दंडही भरावा लागणार आहे. मालमत्ता खरेदी - विक्री पारदर्शक होण्यासाठी १ लाखाहून अधिक रकमेच्या खरेदी-विक्री व्यवहारासाठी पॅन क्रमांक देणे बंधनकारक केले आहे. तसेच २० हजारापेक्षा अधिक रकमेचे रोख व्यवहार करता येणार नाही. या सर्वांमुळे काळ्या पैशाला निश्चित नियंत्रणात आणता येईल.

'अच्छे दिन'ची वाट बघणाऱ्या आम जनतेचा विचार करताना त्यांच्यासाठी 'जीवन-ज्योती' ही पंतप्रधान सुरक्षा विमा योजना काढली जाणार आहे यात महिना एक रुपया असा विमा हप्ता भरून २ लाख रुपयाचा विमा दुर्घटनेसाठी बचाव म्हणून काढता येणार आहे. यासाठी 'जन-धन' योजनेंतर्गत उघडलेल्या खात्यातून ही आकारणी केली जाईल.

'स्वच्छ - भारत' अभियान राबवण्यासाठी आतापर्यंत १५ लाख शौचालये बांधली आहेत व एकंदर ६ कोटी शौचालये बांधण्याचा प्रकल्प आहे. त्यामुळे देशातील लोकांच्या आरोग्याची काळजी घेतली जाईल. प्रश्न उभा राहतो की हे बांधकाम, त्याची स्वच्छता, पाण्याची सोय हा सारा पाठपुरावा कसा होईल?

आपण नेहमी पाहतो अर्थसंकल्पामुळे काय स्वस्त झाले व काय महाग झाले? स्वस्त झालेल्या गोष्टीत एक हजार रुपयांवरील चामड्यांच्या चपला, भारतीय मोबाइल फोन, सोलर वॉटर हिटर, ॲम्ब्युलन्स सेवा, कम्प्युटर टॅबलेट्स, अगरबत्ती, मायक्रोवेव्ह ओव्हन्स, सीलबंद फळे व भाज्या, फ्रिज, राष्ट्रीय उद्याने व म्युझियमसह प्राणी संग्रहालयाला भेटी अभयारण्ये व व्याघ्रप्रकल्पांना भेटी, पेसमेकर, एलईडी/एलसीडी पॅनेल, एलईडी दिवे, पीनटस्, बटर.

या अर्थसंकल्पामुळे सिगारेट, चिरूट, गुटखा, पान मसाला, हॉटेलमध्ये खाणे व राहणे, कुरिअर सेवा, केबल व डीटीएच सेवा, क्रेडिट व डेबिट कार्ड संबंधित सेवा, कपड्याचे ड्रायक्लिनिंग विविध बिलांचा भरणा, आयात केलेली व्यापारी उपयोगातील वाहने, सोडायुक्त शीतपेये, बाटलीबंद पाणी, प्लॅस्टिक पिशव्या आणि सॅक, मद्य, चिटफंड, संगीत कार्यक्रम, लॉटरी, विमा, सिमेंट, शेअर व्यवहार, बिझनेस व एक्सीक्युटीव्ह वर्गाचा विमान प्रवास महाग होणार आहे.

आता cash less banking वर अधिक भर दिला जाणार आहे. जेणेकरून 'Debit & Credit' कार्डाचा वापर हा अधिक होईल. प्रधान मंत्री मुद्रा योजनेअंतर्गत 'मुद्रा बँक' स्थापन होणार आहे हि नवी वित्तीय संस्था उद्योजकांना वित्त पुरवठा करणाऱ्या लघु वित्त संस्थांना (Micro finance institutions) पुनर्वित पुरवेल त्यामुळे लघु- उद्योजकांना त्यांचा विकास करण्यास कर्ज पुरवठा निश्चितच होईल. या वेळी अर्थसंकल्पात म्हटल्याप्रमाणे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या उद्योजकांना प्राधान्य दिले जाईल.

राष्ट्रीय गुंतवणूक निधी (NIIF) रस्ते, रेल्वे व वीज प्रकल्पात गुंतवणूक करेल त्यामुळे पुन्हा उद्योजकाने पोषक वातावरण निर्माण होईल.

थकित कर्जाची समस्या बँकापुढे व इतर वित्तीय संस्थांपुढे आ वासून उभी असते. या पुढे ५०० कोटी रुपयांच्या मालमत्ता असलेल्या सर्व वित्तिय संस्थांना SARFAESI ACT 2002 चा उपयोग करता येईल त्यामुळे त्यांना बुडित कर्जावर लवकरात लवकर कारवाई करता येईल. २०१५-१६ मध्ये सार्वजनिक बँकांना सरकार नवीन भांडवलाच्या रुपाने मदत करत आहे. पोस्टाला सुद्धा पेमेंट बँकांचा परवाना मिळण्याची आशा आहे. तसे झाल्यास देशभरातील पोस्टाची सर्व कार्यालये पेमेंट बँकेची शाखा म्हणून काम करणार व त्यामुळे बँकींग सेवा 'जन-धन योजने'त सर्वांना सुलभ होईल. देशात व्यवसाय करणे सुलभ व्हावे यासाठी दिवाळखोरी संदर्भात कायद्याचे पाठबळ दिले जाईल.

देशातील रोखेबाजार जास्त सशक्त बनवण्याचा विचार असल्यामुळे PDMA ही संस्था उभी केली जाईल सुवर्णरोखे विक्रीसाठी काढले जाणार आहेत. सुवर्णनाणी काढण्याचा विचारही आहे. त्यामुळे लोकांची मानसिकता सुवर्णरोखे व दागिन्यांऐवजी सुवर्ण नाणी घेण्याकडे राहील.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या अमृतवर्षी महोत्सवात एकंदर ६ कोटी घरे बांधण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे सर्वांना घरे मिळून पर्यायाने कित्येकांना बांधकाम व्यवसायाचा रोजगार मिळेल. याची अंमलबजावणी नीट झाल्यास बँकानाही गृहकर्जे वाढविता येतील.

आता आपण महिला वर्गासाठी काय केले आहे ते पाहू. महिलांच्या सुरक्षेसाठी १००० कोटींची तरतूद निर्भया फंडात केली आहे. पण या योजनेचे कार्य प्रभावीपणे होणे गरजेचे आहे. या वर्षी करप्रणालीत महिलांना कोठलीही सवलत दिली नाही. सुकन्या योजनेखाली ५० हजाराची गुंतवणुक केल्यास सदर रक्कम एकूण उत्पन्न करपात्रातून वजा करता येईल. त्यामुळे 'बेटी बचाओ बेटी पढाओ' योजनेला लागणारा पैसा मिळून या अभियानाला प्रोत्साहन मिळेल. महिलांपुरता विचार केला तर केंद्रीय अर्थसंकल्पाने महिला म्हणून थेट त्यांच्या पदरात काही टाकलेले नाही. प्राप्तिकराच्या वजावटीची मर्यादा गेल्या वर्षाचीच कायम ठेवल्याने त्या दृष्टीने महिलांच्या पर्समध्ये वेगळे काही पडलेले नाही. मात्र बचत आणि गुंतवणूक वाढावी म्हणून सर्व घटकांसाठी केलेल्या उपाय योजनांचा विचार केला तर महिलांनाही बचतीला प्रवृत्त करणारा अर्थसंकल्प असे याचे वर्णन करता येईल.

पंतप्रधान 'विद्यालक्ष्मी' योजनेचा लाभ मुलीचे उच्च शिक्षण आणि विवाहासाठी उघडलेल्या सुकन्या समृद्धी खात्याला कर वजावटीची दिलेली जोड, अल्पसंख्यांक विद्यार्थिनींना मिळणारा नयी मंजिल योजनेचा लाभ यांचा वेगवेगळा विचार केल्यास हा अर्थसंकल्प महिलांना दिलासा देणारा ठरू शकतो. अति जेष्ठ महिलांना इतरांप्रमाणे ३०,००० रुपयांची वजावट कोणत्याही आजारांवर मिळेल. पेन्शन प्लॅनसाठी केलेली ५० हजारांच्या ज्यादा वजावटीची तरतूद महिलांसाठी दिलासाजनक ठरेल. अर्थसंकल्प एकंदरीतच कुटुंब म्हणून बचत-गुंतवणूकीचा विचार केला तर केंद्रीय अर्थमंत्री अरूण जेटली म्हणतात तसा तो 'सर्वेपि सुखित: सन्तु:।। म्हणता येईल असा आहे.

फक्त महिला असा विचार न करता अर्थमंत्र्यांनी कुटुंबातील सर्व घटकांतील एक असा महिलांचा विचार केलेला दिसतो.

त्याचवेळी आपण सर्वांनी आरोग्यासाठी, शिक्षणासाठी, निवृत्ती नंतरच्या काळासाठी बचत करण्याचा, भविष्यासाठी देशातील रोख्यांमध्ये गुंतवणूक करण्याचा संदेश आपणास यातून मिळतो. त्यामुळे महिला, बालक, तरुण वर्ग, वृद्ध, उद्योजक व नोकरदार सर्वांना घेऊन देशाच्या उन्नतीकडे 'स्वच्छ भारत' व 'भारतात बनवा' या धोरणांना पूरक असा हा अर्थसंकल्प आहे.

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे

Good Bye "Dev Anand"



रविंद्र मानकर यांना प्रभु तरुणांतर्फे श्रध्दांजली

# युवामंच

## Just in case if you give a thought to it..

**-Anjore Kothare**

Einstein once said, ``Everybody is a genius, but if you judge a fish by its ability to climb a tree, it will live its whole life believing that it is stupid''. This statement has come from one genius for all other geniuses to make them believe that they ARE one, if they don't consider themselves to be one.

Have you ever given a thought to the fact that our education system is just creating workers and not thinkers. As a girl in eleventh standard it is far too early for me to judge the system of which I am a small part. But, I sometimes really feel that unless and until somebody is vocal about it, things will not change. Life is not based on Algebraic expressions . In reality x is never equal to y .In real life X and Y are altogether two different entities.

While solving mathematical problems there are different ways to equate the two variables .But practically x and y maneuver in opposite directions . In such a case both x and y require different guidance to traverse along their path. Here, what our education system does is that it will teach x how to go about its road and also expect y to compete along with x.

In the bargain what happens is that x wins each race because it is on a path of its own choice but y comes to the end of the race believing that it is a complete failure.

This is what we end up doing. Creating one individual who too high on self esteem and thinks that his capability is unsurpassable. The other one who lurks behind will be a diffident individual and spend his entire lifetime thinking that he is good for nothing.

A teacher of mine who taught me debating had once given me a piece of advice which will remain with me forever. She said 'Anjor, out of a 100 people 99 are excellent at stating the problems but are clueless when asked for a solution. There is only one such person who can state the problem and also give a solution to it'. To the above problem I have a solution of my own and I am sure that you will also find one for yourself ....just in case if you give a thought to it.

❋

## पाठारे प्रभू महिला समाज

दिनांक १० आणि ११ जानेवारी २०१५ रोजी महिला सामाजाची लोणावळा - लवासा येथे दोन दिवसीय सहल संस्थेच्या शताब्दीनिमित्ताने आयोजित करण्यात आली. या सहलीच्या आयोजनाची जबाबदारी सौ. बिंबा मनोज नायक यांनी सौ. गौरी नायक, आणि निकोलय कीर्तिकर यांच्या सहाय्याने समर्थपणे पेलली. एकूण पंचेचाळीस महिलांनी या सहलीचा आनंद लुटला. लोणावळ्यातील राजमाची पॉईंट, व्याघ्रेश्वरी देवी मंदीर, नारायणीधाम, लवासा अशा विविध ठिकाणी 'सुहाना सफर' झाली. तऱ्हेतऱ्हेचे खेळ आणि स्पर्धाही मनोरंजनात भर घालून गेल्या. विजयी स्पर्धकांना महिला समाज आणि उपाध्यक्षा सौ. स्वाती जयकरांतर्फे बक्षिसे देण्यात आली.

दिनांक चार जानेवारी २०१५ रोजी महिला समाजाचा दरवर्षीप्रमाणे आनंद मेळावा झाला. खारच्या पा. प्र. सांस्कृतिक सभागृहात भरलेल्या या मेळाव्याचे उद्घाटन सौ. उमा समीर दीक्षित यांच्या हस्ते झाले. एकूण ८४ गाळे नानाविध खाद्यपदार्थ, उपकरणे, दागिने, पर्सेस, वस्त्रे, शोभेच्या वस्तू यांची रेलचेल करणारे होते. या मेळाव्यास 'उद्योगिनी'च्या अध्यक्षा सौ. मीनल मोहाडीकर उपस्थित होत्या. सौ. उर्वशी धराधर यांच्या सौजन्याने रोटरी क्लब पुरस्कृत सर्वोत्कृष्ट स्टॉलला बक्षिस होते. ते सौ. चंद्रिका कामत यांनी पहिल्या क्रमांकाने पटकावले. दुसरे आणि तिसरे बक्षिस सौ. वृंदा जयकर पुरस्कृत होते. सौ. अंजली तेंडुलकर आणि सौ. वैशाली कांदळगावकर या बक्षिसांच्या मानकरी ठरल्या. पुरस्कार वितरण सौ. उमा दीक्षित, सौ. मीनल मोहाडीकर आणि सौ. उर्वशी धराधर यांच्या हस्ते झाले.

समाजाचा शतक महोत्सवी वार्षिक बक्षिस समारंभ खारच्या सांस्कृतिक सभागृहात दिनांक १-३-१५ रोजी दिमाखात साजरा झाला. सौ. दिपश्री सुदीप कोठारे यांनी या समारंभाचे अध्यक्षस्थान भूषविले होते. फ्रेंच, स्पॅनिश, जर्मन भाषाप्रभू असणाऱ्या दिपश्रीताईंनी सन्मानितांना गौरवताना संस्कारशील विनयवृत्ती राखली. संस्थेचे मोठेपण आपल्या भाषणात अधोरेखित केले आणि सन्मानितांना पुरस्कार देताना त्यांच्याबद्दल यथोचित गौरवोद्गार काढले.

या समारंभातील रौप्यपदके आणि त्या पदकांचे मानकरी असे होते -

कै. चित्तरंजन चंद्रकान्त धुरंधर स्म. आणि श्रीम. चंपुबाई आनंदराव धराधर स्मरणार्थ समाजसेवा रौप्य पदक - सौ. मेघना प्रदीप राणे

कै. श्रीम. प्रमिला मोतीराम जयकर स्मरणार्थ उल्लेखनीय व्यक्तिमत्व रौप्य पदक - सौ. वृंदा शाम जयकर

कै. श्री. दत्तकुमार मोरेश्वर धराधर स्मरणार्थ गृहकृत्यदक्ष रौप्य पदक.

श्रीम. कला रामदत्त नायक. कलाताईंच्या नव्वदीनिमित्तही त्यांचा शाल व भेटवस्तू देऊन आगळा सत्कार करण्यात आला.

कै. श्रीम. सुदक्षिणा दिलीप कोठारे स्मरणार्थ सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनी रौप्य पदक - डॉ. कु. शिल्पा सुरेश जयकर

कै. सौ. संपदा सुनील कोठारे स्मरणार्थ रौप्यपदक - सौ. मिहिका मिथिल नवलकर

कै. श्रीम. नीरजा नागेन्द्र तळपदे स्मरणार्थ स्मृतिचिन्ह - डॉ. वैजयंती महेश अजिंक्य

कै. श्री. मधुकर शांताराम मानकर स्म. आणि श्रीम. मीरा शांताराम मानकर स्मरणार्थ घे भरारी रौप्य पदक सौ. नीलिमा महेश कोठारे.

याशिवाय अनेक भगिनींचा विशेष गौरव केला गेला. त्यात कु. आद्या निखिल नवलकर, कु. आदिती सीमित देसाई. सौ. सुमन बॉबी विजयकर, सौ. उर्मिला आदिनाथ कोठारे, सौ. स्वरांगी स्मितचंद्र नवलकर, सौ. हेमाराणी चंद्रहास कीर्तिकर, श्रीम. सुरूपा राणे - देवरुखकर, डॉ. सौ. गीता नवलकर - इब्राहीम, सौ. योगिनी फणीन्द्र तळपदे, सौ. शुभांगी नीलेश कोठारे, सौ. कविता राजस राणे, कु. श्रुती सुकृत विजयकर, कु. शिवानी सुनील नवलकर, कु. सिमरन मनिष धैर्यवान, सौ. बेला कुंदर आगासकर आणि सौ. भक्ती प्रधान-शेट्ये अशी मांदियाळी होती.

समारंभाचे नेटके सूत्रसंचालन सौ. नीता संजित यांनी केले. सौ. स्वाती जयकरांनी आणि सौ. अक्षदा तळपदे यांनी विजेत्यांची छान ओळख करून दिली. प्रास्ताविक सौ. वृंदा जयकर यांचे होते. अध्यक्षाभिनंदन, ईशस्तवन, गौरवगीत नलिनी रामराव तळपदे यांच्या समर्थ लेखणीतून उतरले होते. सौ. अक्षदा अजित तळपदे यांनी ही गीते सादर केली. त्यांना तबल्यावर साथ श्री. प्रदीप श्रीकर राणे यांची होती तर संवादिनीवर श्री. शेषनाथ पावसकर होते. संगीत दिग्दर्शनही पावसकर यांचेच होते.

उपस्थितांना शताब्दी महोत्सवानिमित्त अल्पोपहार आणि कॉफी देण्यात आली.

या सोहळ्यातील सर्वच मानकऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यासोबतच विजेत्यांच्या नातेवाईकांनी उत्स्फूर्तपणे आपले मनोगत व्यक्त केले. काहींनी तत्संबंधी कविता वाचून दाखवल्या. काहींनी वैयक्तिक स्वरूपाचा सत्कार केला. विशेषत: श्रीम. कला रामदत्त नायक यांच्या सत्कार प्रसंगी असे घडले. तसेच सौ. वृंदा शाम जयकर यांच्याही सत्कारप्रसंगी असे घडले. समारंभाच्या अध्यक्षांनी विनविल्यावरून उपस्थितांनी वृंदाताईंना उभे राहून मानवंदना दिली. त्यांच्या रेकी उपचारातील एक भगिनी टुडी या खास कॅनडातून आल्या होत्या. त्यांचे मनोगत हेलावून टाकणारे होते. सौ. मिहिका नवलकर यांचे नवजात बाळ घरी असल्याने गौरवक्रम बदलून त्यांचा प्रथम सत्कार करण्यात आला; ही महिला समाजाची वर्तन सभानताही वाखाणण्याजोगीच होती. या सर्व सत्कार सोहळ्यात संस्थेला पाच लाखांची देणगी देणाऱ्या श्रीम. प्रमिला मधुकर तळपदे यांचा विशेष हृद्य सत्कार करण्यात आला आणि खास बाब म्हणजे या देणगीतून मिळणाऱ्या व्याजाचा विनीयोग समाजाने पुरस्कारविजेत्यांच्या बक्षिसांच्या रकमेत वाढ करून केला. याबद्दल समाजाला दाद दिली पाहिजे.

या गौरव समारंभाला उपस्थितांनी दाद दिली. सभागृह खच्चून भरले होते. अनेकजण मागे उभे राहून या समारंभाचा आनंद लुटत होते. सत्कारमूर्तींचा गौरव करताना पार्श्वभागी सनईचे सूर असते तर अधिक चांगले झाले असते. पण महिला समाज आणि पाठारे प्रभू ज्ञात यांचे सूर मात्र बेमालूम जुळल्याचीच साक्ष हा समारंभ देत होता. महिला समाजाचे शताब्दीमहोत्सवी बक्षिस समारंभाच्या नेटक्या आयोजनासी खास अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

❋

## अभिनंदन

✶ प्रा. सुहासिनी अशोक कीर्तिकर यांचा दिल्लीत झालेल्या निवडणुकीनंतरच्या परिस्थितीवरील अभिप्राय योगिता राव यांनी टाइम्स ऑफ इंडियामध्ये आपल्या लेखात समाविष्ट केला. मराठी दिनाच्या निमित्ताने अमराठी भाषकांसाठी मराठी शिकविण्यासंदर्भात 'सामना' दैनिकात शिल्पा सुर्वे यांनी सुहासिनी कीर्तिकरांच्या अभिप्रायाची नोंद घेतली. (या दोन्ही दूरध्वनीवरून घेण्यात आलेल्या मुलाखती होत्या.) महानगर मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजनात त्यांचा सहभाग होता.

✶ दापोलीच्या महाविद्यालयाला दिलेल्या भेटीत विद्यार्थ्यांसमोर सौ. अचला सुभाष देसाई यांनी फ्रेंचमधून भाषण केले.

❋

# AJOBA and His Teachings

-Natasha Trilokekar



For many of us, the most important lessons we learn in life come from our elders. This is especially true when they are able to live to a wise old age, as my dear grandfather Ravindra Ramrao Mankar did. We were lucky to have him with us in New Zealand in his final months. When he passed away at the age of 91, so many heartfelt condolences poured in. Something that many people mentioned was that my grandfather was always willing to share his experience and knowledge with others.

The last words he said to my mother, was "make sure you encourage the kids". He was of course referring to myself and my younger brother Niraant. I think this moment sums up his life – he always thought of others, cared deeply for his family and was always pushing us to do our best. So, in honour of his wonderful life, here I present to you five things my Ajoba taught me, that I endeavour to live by everyday.

1) **Live fully, and enjoy the small pleasures in life**: One of my grandfather's favourite moments of the day was early morning, where he'd finish his morning exercise, then settle at the table with a hot cup of milk and the morning newspaper, and proceed to devour every page with pleasure. He was hungry for knowledge - he would underline important passages, take clippings of interesting articles to share with me, and devoured the business pages and the sports section. The simple enjoyment he got out of these moments is a memory that heartens me.
2) **Be Good with money, and Do Good with money:** I am sure my grandfather was a smart and successful banker in his working years, but as a young child one often does not understand these things. Instead, what I do remember is the snippets of wisdom he'd send my way, for instance his favourite saying "a penny and a penny make many." I remember going along to Pathare Prabhu Charities Functions, gripping my mum's hand tightly, not understanding much other than that my grandfather was a popular man and everyone knew him. Only now I am older I understand how wisely and generously he handled money – for himself and his family, but also for the widespread good of the community. It inspires my own beliefs that education and healthcare are the most basic human right and we must strive to provide these for all.
3) **Eat well, travel widely, and dress impeccably:** I will always remember Ajoba as being incredibly stylish. His clothes were perfectly tailored, not a single hair out of place, and he took great pride in presenting himself as a classic gentleman. His life in England in the early 1950's clearly influenced his style and sophistication. Visiting his house was always exciting as you never knew what treats he had organised – sometimes a simple bowl of Cheeselings, fresh crab, or a surprise of Tandoori chicken and Biryani. Isn't this the essence of life?
4) **Find value in having Values:** Anyone who knows my Ajoba knows he was a very headstrong, passionate and principled man. He was vocal about issues he felt strongly about, and always relied on his strong moral fibre to dictate his decisions, either in family matters, business or his volunteer work. Whether or not people agreed with him, I think he was universally respected for knowing his values and standing by them.
5) **Be a God-fearing person:** Above all, my grandfather was a stickler for tradition. As the head of the Mankar family, he was careful to ensure that during his life, he completed his religious duties in the correct way, and following his death, these age old rituals started by his 'Dadaji' would continue in the family. In my eyes, he very skillfuly handled the balance between honouring tradition and yet encouraging modern pursuits, education and beliefs, which is an ideal I am constantly striving for.

I do not think that the wealth of his knowledge and teachings can be reduced to a five-point list. However, these sum up the lessons that have had the most profound effect on me, and I wanted to share this. I hope his legacy inspires many to find their own passion and purpose in life.

# ''चिरतरुण विश्वस्त''

-डॉ. सौ. सुरेखा बन्सीधर धुरंधर

'चिरतरुण विश्वस्त' हे शब्द रवींद्र मानकर यांचे वर्णन करण्यासाठी अगदी चपखल बसतात.

प्रभुतरुणाची कार्यकर्ती या नात्याने रवींद्र मानकरांबरोबर काम करण्याची संधी मला लाभली हे मी माझे मोठे भाग्य समजते. विश्वस्त मंडळातील सर्वात ज्येष्ठ व हुशार व्यक्ती म्हणून सुरुवातीला आदरयुक्त भीती वाटत असे. परंतु जसजशी ओळख वाढत गेली व मी त्यांच्या संपर्कात येत गेले तसतसे 'या व्यक्तीचा आणि वार्धक्याचा सुतराम संबंध नाही' या गोष्टीचा प्रत्यय येऊ लागला.

प्रभुतरुणची मीटिंग केव्हाही, कुठेही असली, कितीही वाजता संपली, तरीही रवींद्र मानकरांची हजेरी कधीही चुकली नाही. त्यांचा 'व्यवस्थितपणा, नीटनेटकी रहाणी व फॅशनेबल कपडे' यावर रकानेच्या रकाने लिहिता येतील. रविवारी सकाळच्या मीटिंगला 'जीन्स आणि टी-शर्ट', तर संध्याकाळच्या मीटिंगसाठी 'स्कार्फ आणि जॅकेट' अशा वेषातील रवींद्र मानकर माझ्या कायम स्मरणात रहातील.

कोणी जर का त्यांना 'म्हातारपणाची व्याख्या' विचारली असती, तर ते चटकन् म्हणाले असते, 'Oldage for me is, 20 years ahead of my present age!'

कोणत्याही सामाजिक संस्थेचा कारभार पैशाशिवाय चालत नाही. प्रभुतरुणाच्या आर्थिक व्यवहाराची जबाबदारी संपादक कै. विहंग नायक यांनी एके दिवशी माझ्यावर सोपवली, आणि रवींद्र मानकर यांच्यासारखे मार्गदर्शक मला लाभले. आयुष्यभर डॉक्टरकी करण्यात वेळ घालविलेली मी, मला आर्थिक व्यवहाराचे संपूर्ण अज्ञान होते. परंतु VTI Investments, Fixed Deposits, Investments, Maintainance of Accounts, Updating Bank Pass Books इत्यादीसारखे नियमीत बँकेचे व्यवहार हे रवींद्र मानकरांसारख्यांच्या नजरेखाली शिकायला मिळाले. 'प्रभुतरुणाकडे येणारे पैसे हे लोकांचे आहेत आणि त्यावर मिळणारे व्याज एक दिवससुद्धा बुडता कामा नये.' हे बाळकडू रवींद्रांकडून मला पाजलं गेलं. एफडीवर जास्तीतजास्त व्याज कुठे मिळेल यावर त्यांचा कायम कटाक्ष असे. प्रत्येक सुचनेमध्ये 'समजलं का?' असे विचारण्याची त्यांची लकब माझ्या कायम स्मरणात राहील.

आयुष्य कसे एंजॉय करावे? हे त्यांच्याकडून शिकणासारखं होतं. त्यांच्या घरच्या पार्ट्या किंवा आपण दिलेल्याचा पार्टीनंतर त्यांच्याकडून मिळालेली दाद, याला आता आम्ही सर्व प्रभुतरुणची मंडळी मुकणार आहोत.

न्युझिलंडला जाण्याच्या अगोदर एक हृद्य आठवण ते मागे ठेवून गेले. न्युझिलंडला जाणे-येणे हे नेहमीचेच. परंतु प्रत्येकवेळी जाण्यापूर्वी 'काही काम आहे का?' किंवा 'चेक किंवा पेपर्सवर सह्या करायच्या आहेत का?' असे फोन करून विचारण्याचा त्यांचा शिरस्ता! काही कारणास्तव मी कामाचे कागद सह्या करण्यासाठी पाठवू शकले नाही, तर ते स्वतःहून मुंबईहून पार्ल्याला एकटे आले व जवळजवळ ८०हून अधिक कागदांवर स्वाक्षऱ्या करून दिल्या. या सर्व सोपस्कारांमध्ये जेवणाची वेळ टळून गेल्याचे भान आम्हा दोघांनाही राहिले नाही. मी त्यांना स्टेशनवर पोहोचवायला निघताना सहज विचारले, 'रामकृष्ण हॉटेलमध्ये डोसा खाणार का?' काहीही आढेवेढे न घेता त्यांनी होकार दिला. रवींद्रंच्या बरोबर पुढील तास-दीडतास रंगलेली गप्पांची मैफील ही त्यांची शेवटची भेट!

आज ते आपल्यात नाहीत. परंतु वर स्वर्गात सुहासकाका व विहंग यांच्याबरोबर नक्कीच 'समजलं का?' असे विचारत गप्पांची मैफील रंगली असेल. देवानंदलाही लाजवेल असे उत्साही, चिरतरुण व्यक्तीमत्व ज्यांना लाभले त्या 'रवींद्र मानकर' यांना माझे शतशः प्रणाम.

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणास देणगी

✶ सौ. हर्षा नीलिम त्रिलोकेकर यांजकडून त्यांचे वडील श्री. रवींद्र रामराव मानकर यांच्या स्मरणार्थ रु. १०,०००/-

✶ श्रीमती कुसुम बेनीलाल (पूर्वाश्रमीच्या कु. कुसुम रामराव प्रधान) यांच्या २०-२-२०१५ रोजी झालेल्या जन्मशताब्दीप्रीत्यर्थ (जन्म: २०-२-१९१५) सौ. अचला सुभाष देसाई यांजकडून रु. १००१/-

✶ सौ. इना भोलानाथ तळपदे यांजकडून त्यांच्या लग्नाच्या ५०व्या वाढदिवसाप्रीत्यर्थ रु. ५०१/-. इनाताईंच्या वैवाहिक आयुष्यास शुभेच्छा.

✶ कै. श्रीमती मंजुळा नारायण धराधर यांच्या सातव्या स्मृतिदिनानिमित्त सौ. गीता आंबवणे यांजकडून रु. ५००/-

✶ सौ. जना आणि श्री. रवींद्र नागूजी नवलकर कडून नातू वैभव अमोल रणजीत याच्या विवाहाप्रीत्यर्थ रु. ५०१/-

✳


### खास पाठारे प्रभूंचा ताशा

मुंजी, लग्न, वरघोडा आणि वरातीसाठी संपर्क:-

**श्री. मंगू ताशेवाला**

मोबाईल नं.: ९९२०५८२२६५/९९३०८३८६९९

पत्ता: खोली क्र. ७, पहिला मजला,(जयश्री मसाला वर), बिल्डिंग नं. ६७/६९, कामाठीपुरा ७वी गल्ली, एम. आर. रोड, मुंबई-४००००८


## भावांजली

गेल्या सतरा तारखेला श्री. प्रकाश बाळाजी नायक यांना देवाज्ञा झाली. त्यांचा सेवाभाव निष्ठावंत होता. 'हौशी कला मंदीर' या संस्थेचे दिवाळी संमेलन असो, क्रीडास्पर्धा असोत; श्री. प्रकाश नायक आपल्या सहकाऱ्यांच्या सोबतीने सगळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडीत. सगळ्यांना जमा करणे, कार्यक्रमाची आखणी करणे, कार्यक्रम यशस्वी करणे ही काही येऱ्यागबाळ्याला जमणारी गोष्ट नव्हे. दिवाळीचा आनंद वाढविण्यासाठी नाटक कंपनीला गाठून नाटकाचा प्रयोग मिळवणे आणि ज्ञातीयांना तो विनामूल्य दाखवणे, त्यादिवशी लॉटरी काढून बक्षिसांचे / भेटीचे वाटप करण्यासाठी देणगीदार मिळवणे सध्याच्या काळात कठीणच. पण प्रकाश नायकांनी हे कठीण कर्म सोपे वाटावे इतके सुरळीत केले होते. मला या कार्यक्रमासाठी न चुकता निमंत्रण यायचे. त्यावेळी फोनवर होणारा त्यांचा ऋजु संवाद त्यांच्यातील निरलस सेवाभावी कार्यकर्त्याची चुणूक दाखवी. त्यांच्या कार्याला कृतज्ञ सलाम आणि त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करते. या २३ मार्चला त्यांचा वाढदिवस असणार होता. आता फक्त त्यांच्या वाढत्या आठवणी!

✳

## प्रभुतरुणाची डायरी

### जनन

| | | | |
|---|---|---|---|
| १०-१-१५ | सौ. एमिली आणि श्री. रोहन निखिल विनोद धुरंधर | पुत्र, | अमेरिका |
| १४-१-१५ | सौ. मीहिका आणि श्री. मिथिल चंद्रकिरण नवलकर, | कन्या, | खार |
| २२-१-१५ | सौ. दीपिका आणि श्री. पंकज प्रकाश राव, | जुळ्या कन्या, | पुणे |

### आत्याबाई नाव बोला

आर्मंड रोहन निखिल धुरंधर

### नारळसाखर दिला

२८-२-१५ डॉ. कु. अपूर्वा हर्षद विजयकर, श्री. सर्वेश सहानी (आं. ज्ञातीय)

### विवाह माणिक महोत्सव

०७-१-१५ श्री. प्रकाश विश्वनाथ राव, कु. विद्या आनंदराव धुरंधर
१५-२-१५ श्री. राजन मोतीराम जयकर, कु. केतकी अजराज कोठारे
१६-२-१५ श्री. हेमचंद्र गणपतराव प्रधान, कु. शुभांगी चंद्रकांत नवलकर

### विवाह सुवर्ण महोत्सव

२१-२-१५ श्री. भोलानाथ यशवंत तळपदे, कु. इना गणपतराव प्रधान

### नांदा सौख्यभरे

१६-१-१५ कु. तन्युषा अविनाश कोठारे, श्री. ज्युवेल वर्गीस (आं. ज्ञातीय)
२५-१-१५ श्री. तेजस अरुण रामचंद्र जयकर, कु. अरुणा जयवंत गोरे (आं. ज्ञातीय)
२५-१-१५ श्री. वैभव अमोल रणजित, कु. रिचा अमित जोशी (आं. ज्ञातीय)
०४-२-१५ श्री. अमरीश रवींद्र अजिंक्य, कु. अदिती अरुण सावंत (आं. ज्ञातीय)
०९-२-१५ श्री. सिद्धार्थ सुधीर धैर्यवान, कु. विनी हेमंत तळपदे
११-२-१५ श्री. सौरभ नीलेश प्रधान, कु. राधा प्रवीण धुरंधर
२२-२-१५ श्री. वैभव सुमेध कोठारे, कु. करिश्मा संजय वैद्य
२८-२-१५ श्री. तेजस दीपक तळपदे, कु. विजयता रणजीतसिंग पाटील (आं. ज्ञातीय)
०७-३-१५ श्री. गौरीश अशित झावबा, कु. मृणाल वीरेंद्र जोशी (आं. ज्ञातीय)

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ०३-१-१५ | श्री. राजेंद्र खंडेराव धैर्यवान | वय ७०, | वसई |
| २५-१-१५ | श्रीमती नंदिनी रामराव कोठारे | वय ८०, | भीमराववाडी |
| २६-१-१५ | श्री. मोहन विजय सेजित | वय ६५, | चंदनवाडी |
| २९-१-१५ | श्रीमती सुलेखा शरद तळपदे | वय ८४ | विलेपार्ले |
| ०९-२-१५ | श्रीमती विंदा सतीश धैर्यवान | वय ७४ | कांदिवली |
| १२-२-१५ | श्रीमती निर्मला (कलावती) गजानन जयकर | वय ८६ | मीरा रोड |
| १६-२-१५ | श्रीमती रश्मी भोलानाथ नवलकर | वय ७२ | शीव |
| १७-२-१५ | श्री. रवींद्र रामराव मानकर | वय ९१ | ऑकलंड |
| १७-२-१५ | श्री. प्रकाश बाळाजी नायक | वय ७० | खार |
| ०१-३-१५ | श्रीमती कुसूम माधव विजयकर | व ९१ | पेडर रोड |


**Statement about ownership and other particulars about news paper**

**PRABHU TARUN**

**Form IV (See Rule 8)**

**To be published in the first issue after the last day of February**

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Place of Publication | : | B3 Parijat Patel Estate, Jogeshwari, Mumbai-400 102. |
| 2) | Periodicity of Publication | : | Monthly |
| 3) | Printers Name | : | Smt. Suhasini kirtikar |
| 4) | Address | : | Same as above |
| | Editors Name | : | Smt. Suhasini kirtikar |
| | Nationality | : | Indian |
| 5) | Address | : | Same as above |
| 6) | Name & Addres of Individuals who own the News Paper and Partners of Sharehold holding more than one Percent of Capital. | : | Board of Trustees Prabhu Tarun |

I Smt. Suhasini Kirtikar hereby declare that particulars given above are true to the best of my knowledge and belief.

**01-03-2015** **Suhasini Kirtikar**
Mumbai Signature of Publisher



हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

**संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर** RNI NO. 14613/67